सकाळ Vidya

# विद्यार्थ्यांचे गुरुकुल : महात्मा गांधी विद्यामंदिर

महात्मा गांधी विद्यामंदिर हे नाशिक जिल्ह्यातील नव्हे, तर उत्तर महाराष्ट्रातील एक नावाजलेले शैक्षणिक केंद्र आहे. उत्तर महाराष्ट्रातील शिक्षणाची सार्वत्रिक गरज व ज्ञानसाधनेचे उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवून २ ऑक्टोबर १९५२ मध्ये कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी 'महात्मा गांधी विद्यामंदिर' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. कर्मवीरांची राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर निस्सीम भक्ती होती. या भक्तीतूनच आपल्या शैक्षणिक संस्थेस त्यांनी महात्मा गांधी यांचे नाव दिले. दुर्गम, अतिदुर्गम, तसेच दुर्लक्षित जनसामान्यांच्या शिक्षणासाठी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य सतत मनात ठेवून या शैक्षणिक संस्थांच्या रूपाने एक नवे दालन खुले झाले. ग्रामीण, दुर्गम, आदिवासी, वंचित, पीडित, गोरगरिबांच्या शिक्षणासाठी भाऊसाहेबांनी प्रचंड मेहनत घेतली. अनेक गरजू निर्वासितांसाठी छात्रालये, वसतिगृह, आश्रमशाळा काढल्या. भाऊसाहेबांना वंचितांच्या शिक्षणासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या अथक प्रयत्नांतून स्थापन झालेल्या अनेक शिक्षण संस्थांतून आज लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेने अल्पावधितच के.जी. ते पी.जी.पर्यंत शिक्षण व संशोधन, तसेच व्यावसायिक शिक्षणाची संधी जनसामान्यांना उपलब्ध उपलब्ध करून दिली. 'केजी ते पीजी'चा हा प्रवास मेहनत, जिद्द, आणि चिकाटीच्या जोरावर होऊन संस्थेचा उत्तर महाराष्ट्रातील 'महात्मा गांधी विद्यामंदिर' हा एक ब्रॅन्डच निर्माण झाला आहे. काळानुरुप संस्थेने विविध शाखा, व्यावसायिक अभ्यासक्रम, तसेच संशोधन केंद्रही सुरू करून आधुनिकतेकडे वाटचाल केली आहे.

कर्मवीरांनंतर लोकनेते व्यंकटराव हिरे यांनी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे पालकत्व स्वीकारून जीव ओतला. 'शिक्षण हेच माझे जीवितकार्य' या भाऊसाहेबांच्या उद्‌गारांचा कित्ता गिरवून या लहानशा रोपट्यांचे प्रचंड अशा वटवृक्षात रुपांतर घडवून आणले. त्यांनी अनेक महाविद्यालये सुरू केली. त्यासाठी सुंदर, सुसज्ज इमारती बांधून घेतल्या. व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करून शिक्षणाला जनताभिमुख केले. १९७१ मध्ये नाशिकची तपोभूमी पंचवटी येथे 'पंचवटी महाविद्यालय' सुरू केले. युवतींना उच्च शिक्षण मिळावे म्हणून मालेगाव येथे 'महिला महाविद्यालय' सुरू केले. लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या आकस्मिक निधनानंतर श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी शैक्षणिक कार्यात कोणताही खंड पडू दिला नाही. १९८० ते १९८५ या काळात पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर निवडून येऊन उच्च शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. नामपूर, सुरगाणा, हरसूल ही महाविद्याले ताईंनीच या काळात सुरू करून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा गांधी विद्यामंदिरचे जनरल सेक्रेटरी म्हणून प्रशांतदादा हिरे १९८० पासून कार्यरत आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमात गेल्या २०-२५ वर्षांपासून करिअरच्या संधी रोडावत चालल्या आहेत. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढतो आहे. याच जाणिवेतून संस्थेने विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे आणि गरजेप्रमाणे महाविद्यालयाचा विस्तार, औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च सेंटर, कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट हे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केले. २००३ पासून डॉ. अपूर्व हिरे संस्थेचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. संस्थेच्या शैक्षणिक, गुणात्मक व संख्यात्मक विकासकार्यात सक्रियतेने कार्यरत आहे. अद्वय हिरे हेदेखील महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.